अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव
दि.०४.०४.२०२५

**प्रेस नोट**

**डॉ.जयवंत जुलाल मोरे,वय ४६ वर्षे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी, रा.दत्त मंदिरा जवळ, शिवानी केटरर्स जवळ, वाघ नगर, जळगाव (खाते सार्वजनीक आरोग्य विभाग ,वर्ग १) यांना १५,०००/—रूपये लाच स्विकारतांना अँन्टी करप्शन ब्युरो, जळगांव पथकाने रंगेहात पकडले.**

—————————————०००००००—————————————

तक्रारदार यांची सेवातंर्गत पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी सत्र २०२४ पी.एस.एम.या विषया करिता वेदांत वैद्यकिय महाविद्यालय पालघर येथे प्रतिनियुक्ती झाली होती. त्याप्रमाणे तक्रारदार यांना जिल्हा परिषद जळगाव येथुन प्रतिनियुक्तीचे ठिकाणी पालघर येथे कार्यमुक्त करण्याचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,जळगाव यांना पाठवण्यासाठी वर नमुद आलोसे व डॉ.सचिन भायेकर, जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी तक्रारदार यांचेकडे ३० हजार रुपये लाचेची मागणी केले बाबत तक्रारदार यांनी दि.०३.०४.२०२५ रोजी ला.प्र.वि.जळगाव घटकाचे सापळा पथकाकडे तक्रार लिहुन दिली होती.

सदर तक्रारीची दि.०३.०४.२०२५ व दि.०४.०४.२०२५ रोजी पडताळणी केली असता वर नमुद आलोसे यांनी तक्रारदार यांना सेवातंर्गत पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी सत्र २०२४ पी.एस.एम.या विषया करिता वेदांत वैद्यकिय महाविद्यालय पालघर येथे प्रतिनियुक्तीचे ठिकाणी जिल्हा परिषद,जळगाव येथुन कार्यमुक्त करण्यासाठीचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,जळगाव यांना पाठवण्याचे काम डॉ.सचिन भायेकर,जिल्हा आरोग्य अधिकारी यांचेकडुन करुन देतो असे सांगुन त्यांच्या नावाने तक्रारदाराकडे प्रथम ३०,०००/—रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती १५,०००/—रुपये लाच रक्कम दि.०४.०४.२०२५ रोजी १६.२० वा.चे सुमारास आरोग्य विभाग,जिल्हा परिषद जळगाव येथे पंचासमक्ष स्वत: स्विकारली म्हणुन गुन्हा.

**टिप :— सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, त्यांच्याकडे कोणत्याही शासकिय नोकराने त्यांचे शासकिय काम करून देण्यासाठी शासकिय फी व्यतिरिक्त लाचेची मागणी केल्यास तात्काळ संपर्क साधावा.**

| | |
|---|---|
| **कार्यालयाचा पत्ता** | **अँन्टी करप्शन ब्युरो, जळगांव**<br><br>**अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, जळगांव** |
| **दुरध्वनी क्रमांक** | **०२५७—२२३५४७७** |
| **मोबाईल क्रमांक** | **९७०२४३३१३१** |
| **टोल फ्री क्रमांक** | **१०६४** |

पोलीस उप अधिक्षक अँन्टी करप्शन ब्युरो, जळगाव सत्यमेव जयते

**योगेश जी. ठाकूर**
पोलीस उप अधिक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव